MAHARASHTRA TOURISM

# महाराष्ट्र

# एक अनोखं जग

पर्यटन संचालनालय, पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन

जानेवारी २०२६ / अंक १


प्रतापगड किल्ला


दिवेआगर समुद्रकिनारा


वेळास समुद्रकिनारा

## महाराष्ट्रातील विशेष उपक्रमांचा आढावा

जानेवारी महिना पर्यटन क्षेत्रातील विकासाच्या दृष्टीने परिपूर्ण ठरला. वर्षाअखेरीस मिळालेल्या सुट्ट्या आणि नववर्षाच्या स्वागतासाठी पर्यटकांनी राज्याच्या विविध पर्यटन स्थळांकडे गर्दी केली होती. शिवाय पर्यटन विकास महामंडळाच्या निवासस्थानांमध्ये राहण्याकडे पर्यटकांचा अधिक कल होता. महिन्याभरात आयोजित करण्यात आलेल्या विविध महोत्सवांमध्ये महाराष्ट्र पर्यटन विभागाचे दालनही उभारण्यात आले होते.

## प्रजासत्ताक दिनी दादर 'छत्रपती शिवाजी महाराज पार्क' येथील संचलनात 'कोकण पर्यटन' चित्ररथाची चर्चा

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्क मैदानावर मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण करून भव्य संचलनास सुरुवात झाली. या संचलनात पर्यटन मंत्री मा. शंभूराज देसाई यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आलेला पर्यटन विभागाचा 'कोकण पर्यटन' हा चित्ररथ विशेष आकर्षण ठरला.




यावेळी डॉ. प्रज्ञा मनोहर, कोकण विभाग, उपसंचालक (पर्यटन) यांच्यासह पर्यटन विभागातील अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कोकणच्या समृद्ध संस्कृती, ऐतिहासिक वारसा आणि आधुनिक पर्यटन सुविधांचा सुरेख संगम या चित्ररथातून सादर करण्यात आला.

या चित्ररथाच्या माध्यमातून कोकणच्या विस्तीर्ण किनारपट्टीसह तेथील प्रमुख पर्यटन स्थळांचे प्रभावी चित्रण करण्यात आले. अरबी समुद्राचे रक्षण करणाऱ्या अभेद्य विजयदुर्ग किल्ल्याची भव्य प्रतिकृती तसेच गणपतीपुळे मंदिराचा देखावा प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत होता. यासोबतच कोकणातील निसर्गरम्य होम स्टे आणि ग्रामीण पर्यटनाचा देखावा, स्कुबा डायव्हिंग, डॉल्फिन प्रतिकृती आणि जलक्रिडांमधील लोकप्रिय बनाना राइडचे कलात्मक सादरीकरण करण्यात आले.

## 'भारत पर्व 2026'मध्ये महाराष्ट्राच्या पर्यटन विभागाच्या दालनाला उत्स्फुर्त प्रतिसाद

भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून लाल किल्ल्यासमोरील लॉन्स व ज्ञानपथ, नवी दिल्ली येथे 26 ते 31 जानेवारी दरम्यान 'भारत पर्व 2026' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या सहा दिवसीय महोत्सवामध्ये महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाने दालन उभारून सहभाग घेतला होता. महोत्सवामधील पर्यटन विभागाच्या दालनाने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले.

सदर महोत्सवामध्ये विविध राज्यांतील सांस्कृतिक विविधता, खाद्यपदार्थ, पोशाख, हस्तकला, लोककला आणि संगीताचे अनोखे दर्शन घडले. विविधतेमध्ये एकता असल्याचा संदेश या महोत्सवामधून देण्यात आला. 'भारत पर्व 2026'मध्ये पर्यटन विभागाच्या दालनाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या दालनाद्वारे राज्यातील विविध पर्यटन क्षेत्र, पर्यटन स्थळी जाण्याची सोय, उपलब्ध सोयी-सुविधा इत्यादी माहिती उपलब्ध करून देण्यात आली.



# आगामी कार्यक्रम

## आशियातील सर्वात मोठे प्रदर्शन ‘ओटीएम 2026’साठी महाराष्ट्र पर्यटन विभाग तयार

वांद्रे येथील जिओ कन्व्हेन्शन सेंटर येथे आशियातील सर्वात मोठा ट्रॅव्हल ट्रेड शो ‘आऊटबाऊंड ट्रॅव्हल मार्ट 2026’चे (ओटीएम) आयोजन करण्यात आले आहे. जागतिक स्तरावर पर्यटनाला चालना देण्यासाठी दरवर्षी मुंबईत या तीन दिवसीय प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी हे प्रदर्शन 5 ते 7 फेब्रुवारी दरम्यान होणार आहे. राज्यात प्रदेशनिहाय असलेली पर्यटनस्थळांची माहिती देखील ‘ओटीएम’च्या माध्यमातून देण्यात येईल.

सदर प्रदर्शनामध्ये महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या दालनाद्वारे राज्यातील विविध पर्यटन क्षेत्र, त्या ठिकाणी जाण्याची सोय, उपलब्ध सेवा सुविधा इ. माहिती पर्यटकांना उपलब्ध करून देण्यात येईल. ओटीएम प्रदर्शनात दरवर्षी 60 देशांतील 2,100 प्रदर्शक, 30 राज्य आणि 40 हजारांहून अधिक भागधारक सहभाग घेतात. या ट्रॅव्हल ट्रेड शोमध्ये पर्यटन क्षेत्राच्या विस्तारासाठी देश-विदेशातील अनेक भागधारकांची दालने आहेत. देश-विदेशातील पर्यटन क्षेत्रातील परस्पर व्यावसायिक संबंध वृद्धिंगत करणे व पर्यटनाची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे हा या प्रदर्शनाचा उद्देश आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जुन्नरमध्ये ‘हिंदवी स्वराज्य महोत्सव २०२६’

पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहरात कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 396 व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या वतीने ‘हिंदवी स्वराज्य महोत्सव 2026’ चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून राज्याची संस्कृती, समृद्ध इतिहासाला उजाळा मिळणार आहे. सदर महोत्सवानिमित्त इतिहासाची साक्ष देणाऱ्या जुन्नर शहरात कला, संगीत, साहस अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

शिवप्रेमी, दुर्गप्रेमी, पर्यटक आणि सर्व नागरिकांसाठी हा महोत्सव पर्वणी ठरणार आहे. तरुण पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची ओळख करून देण्यासाठी, तसेच देशी-विदेशी पर्यटकांमध्ये राज्यातील गड-किल्ल्यांविषयी आकर्षण निर्माण करण्यासाठी, राज्यातील पर्यटन स्थळे, कला संस्कृती व पाककृती यांचे दर्शन घडविण्यासाठी हा महोत्सव महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# महत्त्वाच्या बातम्या

## पर्यटन स्थळांवर भटक्या कुत्र्यांवर बंदी, राज्य सरकारचा निर्णय

राज्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळांवर दरवर्षी लाखो पर्यटक भेट देतात. मात्र, भटक्या कुत्र्यांचा मोकाट वावर, त्यातून निर्माण होणारी भीती यामुळे पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. याच पार्श्वभूमीवर पर्यटनस्थळांवर तसेच पर्यटन विभागाच्या अखत्यारीतील निवासस्थाने, विश्रामगृहे आणि त्या आजूबाजूच्या परिसरात भटक्या कुत्र्यांचा वावर रोखण्याचे आदेश देण्यात आले आहेत.




या नव्या निर्णयानुसार, प्रमुख पर्यटन स्थळे, समुद्रकिनारे, किल्ले, धार्मिक स्थळे, पर्यटन निवासस्थाने आणि पर्यटकांची वर्दळ असलेल्या भागांमध्ये भटक्या कुत्र्यांचा प्रवेश रोखण्यासाठी ठोस उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था आणि संबंधित यंत्रणांच्या मदतीने या परिसरातून भटक्या कुत्र्यांना हटवणे, त्यांचे पुनर्वसन करणे आणि भविष्यात त्यांचा वावर होऊ नये यासाठी नियोजन केले जाणार आहे. वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या दहशतीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शासनाकडून घेण्यात आलेला सदर निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

## सिंहगडावर पर्यटकांची गर्दी, 20 दिवसांतच एक लाख पर्यटक दाखल



सुट्ट्यांचा हंगाम, ऐतिहासिक वारशाचे आकर्षण आणि निसर्गसौंदर्याची ओढ यामुळे सिंहगड परिसरात पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली. वनविभागाच्या माहितीनुसार 20 दिवसांत सुमारे एक लाख पर्यटकांनी गडाला भेट दिली. 22 डिसेंबर 2025 ते 11 जानेवारी 2026 या कालावधीत 10 हजार 831 दुचाकींमधून सुमारे 21 हजार 662 पर्यटक आले. याच कालावधीत सात हजार 493 चारचाकींमधून सुमारे 37 हजार 465 पर्यटकांनी सिंहगडाला भेट दिली. तसेच खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांमधूनही सुमारे 37 हजार पर्यटक गडावर दाखल झाले.

सिंहगडावर आलेल्या पर्यटकांनी तेथील खाद्यसंस्कृतीला विशेष पसंती दर्शविली. सिंहगड परिसरामध्ये कांदा भजी, पिठलं व भाकरी, भरीत, दही व ताक, लिंबू सरबत आदी खाद्यपदार्थांवर पर्यटकांनी ताव मारला.

## किल्ले रायगडावर देशातील पहिला 360 अंशांचा ‘लाईट अँड साऊंड शो’



हिंदवी स्वराज्याची राजधानी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या वैभवशाली परंपरेला जपणारा किल्ले रायगड आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नव्या रुपात उजळणार आहे. किल्ले रायगड नव्याने इतिहासप्रेमींच्या भेटीला येणार आहे. बहुप्रतिक्षित 'लाईट अँड साऊंड शो' येत्या काही दिवसांत किल्ले रायगडावर सुरू होणार आहे. देशातील पहिलाच 360 अंशांचा ‘लाईट अँड साऊंड शो’ रायगडावर उभारला जाणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर रायगड प्राधिकरणाचे अध्यक्ष छत्रपती संभाजीराजे यांनी किल्ले रायगडावर प्रत्यक्ष भेट देत कामांची पाहणी केली.

जवळपास 45 मिनिटांच्या या शोमध्ये बाजारपेठ, होळीचा माळ, नगारखाना, राजसदर, जगदीश्वर मंदिर, शिवसमाधी स्थळासह गडावरील इतर शिवकालीन वास्तू, मावळ्यांचे पराक्रम, शिवराज्याभिषेक सोहळा, तसेच स्वराज्याची उभारणी या सर्व ऐतिहासिक क्षणांना प्रकाश आणि ध्वनी प्रभावातून जिवंत केले जाणार आहे. त्यामुळे रायगडावर येणाऱ्या देश-विदेशातील पर्यटकांसाठी हा शो एक मोठे आकर्षण ठरणार आहे.

## युनेस्को दर्जाप्राप्त गडांच्या स्वच्छतेसाठी मोहीम

युनेस्कोने राज्यातील 11 किल्ल्यांना ऐतिहासिक वारसास्थळ म्हणून दर्जा दिला आहे. हा दर्जा जतन करण्यासाठी सर्व गडकिल्ल्यांच्या स्वच्छतेसाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. रायगड, प्रतापगड, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, राजगड, पन्हाळा, साल्हेर, लोहगड, सुवर्णदुर्ग, शिवनेरी व खंदेरी या किल्ल्यांना युनेस्कोने ऐतिहासिक वारसास्थळाचा दर्जा दिला आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून या गडकिल्ल्यांवर स्वच्छता मोहीम हाती घेऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेला हा ऐतिहासिक दर्जा जतन करण्याचे आवाहन मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांना केले होते. त्यानुसार या गडकिल्ल्यांच्या स्वच्छतेसाठी लवकरच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे गडकिल्ला स्वच्छता व संवर्धन मोहीम राबवणार असल्याची घोषणा शिंदे यांनी एका प्रतिकात्मक कार्यक्रमात केली. 'मानाचा मुजरा, हटवूया कचरा' असे या स्वच्छता मोहिमेचे ब्रीदवाक्य आहे.



गडकिल्ल्यांच्या परिसरात कार्यरत असणाऱ्या सामाजिक संस्थांच्या मदतीने ही मोहीम राबवली जाईल. गडकिल्ल्यांवर पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे होत असलेल्या प्लास्टिक कचऱ्याचे संकलन व पुनःचक्रीकरण करून गडकिल्ल्यांची मासिक स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, रोप लागवड अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन या मोहिमेद्वारे करण्यात येणार आहे.

# हिवाळ्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळे

## दिवेआगर

रायगडमधील श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर हे थंडीच्या महिन्यात नंदनवनासारखे बहरून जाते. निसर्गाच्या कुशीत वसलेल्या या ठिकाणी साहसी खेळही प्रसिद्ध झाले आहेत. सुमद्रकिनारी फेरफटका, नैसर्गिक सौंदर्य अनुभवत घोड्यावरून रपेट मारायला जाणे असो किंवा बनाना बोट राइड, स्लीपर बोट राइड सारख्या थरारक खेळांचा आनंद घेणे असो हे सारे काही रोमहर्षक क्षण येथे तुम्ही अनुभवू शकता. एकीकडे कोळीबांधवांचा उत्स्फूर्तपणे काम करत असण्याचा नजारा प्रत्यक्षात अनुभवता येतो. पांढऱ्या शुभ्र सीगलचे थवे या पर्यटन स्थळाचे मुख्य आकर्षण आहेत. या किनाऱ्यावर अनेक स्थलांतरित पक्षी देखील पर्यटकांना पाहायला मिळतात.



## श्रीवर्धन



शहरातील धावपळीचे आयुष्य, नेहमीच्या कामामधून स्वतःसाठी निवांत वेळ हवा अशी प्रत्येक चाकरमान्याची इच्छा असते. अशावेळी पर्यटक शांत व निसर्गरम्य पर्यटन स्थळांना पसंती दर्शवतात. दरम्यान शांतता आणि निसर्गाच्या कुशीत राहता यावे म्हणून श्रीवर्धन आणि त्या परिसरात असणारे समुद्रकिनारे पर्यटकांसाठी उत्तम पर्याय आहेत. येथील स्वच्छ समुद्रकिनारा, लाटांचा आवाज आणि आजूबाजूचा सुंदर परिसर यामध्ये अनेकजण रमून जातात. पर्यटनाच्या बाबतही श्रीवर्धन अत्यंत समृद्ध आहे. येथील लक्ष्मी नारायण मंदिर, सुवर्ण गणेश मंदिर, जवळच असलेले हरिहरेश्वर आणि दिवेआगर व अन्य समुद्रकिनारे तुमचा सर्व थकवा बाजूला सारत निसर्गाचे मनमोहक दर्शन घडवते. श्रीवर्धनला ऐतिहासिक ओळखही आहे. याठिकाणी अजूनही पेशवेकालीन बऱ्याच वास्तू आणि मंदिरे पाहायला मिळतात. शांतता, निसर्गाचे सुंदर रूप अनुभवण्यासाठी तुम्ही श्रीवर्धनला येण्याचे नियोजन करू शकता.

## वेळास

मदनगड किंवा दापोली येथून हाकेच्या अंतरावर असलेला सुंदर समुद्रकिनारा म्हणजे वेळास समुद्रकिनारा. सामान्यातः समुद्रकिनारी माणसांची गर्दी आपण पाहिली असेल, पण या किनाऱ्याचे वैशिष्ट्य असे की, इथे चक्क कासवांची जत्रा भरते. मागील कित्येक वर्षांपासून फेब्रुवारी-एप्रिलच्या मध्यापर्यंत, वेळास समुद्रकिनारी दुर्मिळ ऑलिव्ह रिडले कासव गर्दी करतात. आंजर्ले या हाकेच्या अंतरावर असणाऱ्या समुद्रकिनारी एप्रिलमध्ये कासव महोत्सव आयोजित केला जातो. अंड्यातून बाहेर पडणाऱ्या ऑलिव्ह रिडले कासवांचे समुद्राच्या दिशेने पडणारे पहिले पाऊल पाहण्याचा हा अनुभव खरोखरच विलक्षण असतो. थंडगार बेभान वारा, फेसाळत्या समुद्राच्या लाटा, नारळी पोफळीच्या बागा आणि सोबत कोकणी मेजवानी! या सहलीचे नियोजन करण्यासाठी हिच कारणे तुम्हाला पुरेशी आहेत.



MAHARASHTRA TOURISM

MAHARASHTRA

www.maharashtratourism.gov.in | www.mahaatithi.org

**Follow us on:**

MaharashtraTourism

diot@maharashtratourism.gov.in

@maha_tourism

maharashtratourismofficial